CIDCO
WE MAKE CITIES
प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
सिडको
शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-5650 0900; Fax: 91-22-5650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ninawe.mb@cidcoindia.com

दि. ६-०६-२००९

# खारघर, कामोठे, घणसोली आणि वाशीगाव येथील अनधिकृत बांधकामे निष्कासित

नवी मुंबईतील वाढत्या अनधिकृत बांधकामांवर व अतिक्रमणांवर नियंत्रण आणण्याकरिता सिडको अतिक्रमण विभागाने हाती घेतलेल्या अनधिकृत बांधकाम/अतिक्रमण निष्कासनाच्या व्यापक मोहिमेअंतर्गत खारघर, कामोठे, घणसोली, वाशीगाव येथील अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली.

दि. १३ मे २००९ रोजी खारघर येथील सायन्स पार्क, गोल्फ क्लब आणि इतर राखीव भूखंडांवरील ११० झोपड्या निष्कासित करण्यात आल्या. तसेच दि. १९ मे २००९ रोजी कामोठे नगरातील सेक्टर-६ मधील भू. क्र. ३४ येथील उद्यानासाठी राखीव असलेल्या ४४४ चौ. मी.चा भूखंड, सेक्टर-२१ येथील कम्युनिटी सेंटरकरिता राखीव असलेला भू.क्र. ३७ येथील १० व्यापारी गाळ्यांचे २७०० चौ. मी.चे क्षेत्र, सेक्टर-११ मधील कॉलेज व हॉस्पिटलसाठी राखीव असलेला भूखंड क्र. १ येथील १०० फेरिवाले व एक बांधण्यात येत असलेले बांधकाम अशा एकूण १०,२९० चौ.मी. क्षेत्रफळाचा भूखंड, सेक्टर-८ येथील पोलीस स्टेशनकरिता राखीव असलेल्या २४३९ चौ.मी. क्षेत्रफळावरील ६० फेरिवाले, तसेच सेक्टर-११ येथील निवासी वापराकरिता राखीव असलेल्या १६८० चौ. मी. क्षेत्रफळाच्या भूखंडावरील बांबू व पॉलिथीनचे शेड असलेले एक दुकान व गॅरेज निष्कासित करण्यात आले.

दि. २१ मे २००९ रोजी घणसोली येथील सेक्टर-२९सी व सेक्टर-३०, ऐरोली येथील सेक्टर-८ ए व दि. २२ मे, २००९ रोजी घणसोली, गोठिवली व तळवली येथील सेक्टर-२४ व सेक्टर-२७ या ठिकाणच्या अनधिकृत चाळींचे बांधकाम अनधिकृत बांधकामे विभागाने राबवलेल्या मोहीमेद्वारे निष्कासित करण्यात आली. त्यानंतर उपरोक्त सिडको क्षेत्रातील १२.५% योजनेतील व नोडल एरियाकरिता राखीव असलेल्या भूखंडांवरील १३९ चाळी निष्कासित करण्यात आल्या. दि. २६ मे २००९ रोजी वाशी गावातील सेक्टर-३१ येथील २१ भूखंडांवरील १५ पक्की व ७ कच्च्या स्वरूपातील १२.५% योजनेअंतर्गत राखीव असलेल्या या क्षेत्रातील चाळी निष्कासित करण्यात आल्या. दि. २७ मे २००९ रोजी खारघर येथील सेक्टर-११ व १२ मधील अंदाजे २०० फेरिवाले आणि हॉटेल व व्यापारी गाळ्यांसमोरील १० पत्र्यांचे शेड निष्कासित करण्यात आले. कार्यवाही दरम्यान अनधिकृत बांधकामे करणाऱ्या २३ बिल्डर्सच्या विरोधात रबाळे पोलीस स्थानकात मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे यांच्या द्वारे गुन्हा दाखल करण्यात आला.

सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक **श्री.जी.एस. गिल्ल** व सहव्यवस्थापकीय संचालक **श्री. दिलीप जाधव** यांचे मार्गदर्शन लाभलेली सदर मोहीम सिडकोचे अनधिकृत बांधकाम विभागाचे मुख्य नियंत्रक **श्री. सुमंत भांगे** यांच्या नेतृत्वाखाली कडेकोट बंदोबस्तात पार पडली. अतिशय सुनियोजित व सुसूत्ररित्या पार पाडण्यात आलेल्या, या मोहिमेकरिता सुमारे २५० मजूर, ५ पोकलेन, ६ जेसीबी मशीन, ५ गॅसकटर्स, पोकलेन यंत्राच्या वाहतुकीसाठी २ ट्रेलर्स, मोहिमेतील मनुष्यबळाच्या वाहतुकीकरिता १५ ट्रक, पोलीस व सिडको कर्मचाऱ्यांच्या वाहतुकीकरिता १५ जीप्स, आणीबाणीच्या प्रसंगाकरिता नवी मुंबई अग्निशमन दलाचा एक बंब आणि ॲम्ब्युलन्स अशा सुसज्ज सामग्रीचा उपयोग करण्यात आला. अशा प्रकारच्या अतिक्रमणविरोधी मोहिमांना संवेदनशील क्षेत्रात येणाऱ्या जोखमींच्या अनुषंगाने अत्यंत काटेकोर बंदोबस्त ठेवण्यात आला होता. ३०० ते ३५० पोलीस अधिकारी-कर्मचारी, राज्य राखीव दलाची एक तुकडी, दंगा नियंत्रण पथक आणि सिडको सुरक्षा दलाचे ४५ सुरक्षा रक्षक यांचा अत्यंत चोख बंदोबस्त बाळगण्यात आला होता.

ही मोहिम शांततेने पार पाडण्याकामी नवी मुंबई पोलीस दलाने व नवी मुंबई महानगर पालिकेच्या क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी अतिशय मोलाचे सहकार्य दिले, नवी मुंबईचे माजी पोलीस आयुक्त **श्री. रामराव वाघ** यांनी या मोहिमेत जातीने लक्ष घातले, तर पोलीस उपायुक्त **श्री. दुधे** यांनी या क्षेत्राला भेट देऊन कामाची जातीने पहाणी केली. पार पडलेल्या मोहिमेतील प्रत्येक विभागांच्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी मोलाचे सहकार्य दिले.साहाय्यक पोलीस आयुक्त **श्री. पुरुषोत्तम कराड,** रबाळे पोलीस स्थानकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक **श्री. दत्तात्रय दातार** व पोलीस निरीक्षक **श्री. भोंग,** वाशी पोलीस स्थानकाचे प्रभारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक **श्री. चापेकर,** पोलीस निरीक्षक **श्री. गावीत** तसेच कळंबोली पोलीस स्थानकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक **श्री. दुग्गल** आणि पोलीस निरीक्षक **श्री. शुक्ला,** खारघर पोलीस स्थानकाचे पोलीस उपनिरीक्षक **श्री. गरड** आणि पोलीस उपनिरीक्षक **श्री. पवार** राज्य राखीव दलाचे समस्त अधिकारी यांचे सहकार्य अतिशय महत्त्वाचे होते. शिवाय सिडको भूमी, नियोजन, अभियांत्रिकी आणि सुरक्षा विभागाचे अधिकारी–कर्मचारी यांचे सहकार्यही महत्त्वपूर्ण होते.

मोहिमेत कार्यरत असणाऱ्या सुमारे १००० व्यक्तींच्या सरंजामाच्या आहाराची तजवीज करण्याकामी सिडकोचे कॅटरिंग कंत्राटदार तसेच मनुष्यबळाचे कंत्राटदार यांचेही चांगले साहाय्य मिळाले. सिडकोच्या अतिक्रमणविरोधी पथकाचे **श्री. सुभाष गोसावी, श्री. मोहन भोईर, श्री. नितीन कांबळे, श्री. जे. पी. पवार, श्री. दिलिप गांगुर्डे, श्री. रावसाहेब देवकर, श्री. सचिन वैती, श्री. रावसाहेब सुरवसे, श्री.व्ही. एस. तांडेल, श्री. आर. आर. ठाकूर, श्रीमती एस. एस. गोरे, श्री. जी. डी. उरणकर, श्रीमती जी.जी. मोरजे, श्री. ए. आर. म्हात्रे, श्री. बी. जी. भोईर, श्री. के. जी. मोहिते** व **श्री. ए. सी. तोरडे** यांनी या कारवाईत सक्रीय सहभाग दिला.

---

कृपया वरील वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून / माध्यमातून ठळक प्रसिद्धी द्यावी, ही विनंती कळावे

**(डॉ. मोहन निनावे)**
जनसंपर्क अधिकारी, सिडको

प्रति ____________________

____________________